## प्रेस नोट दि. 25/06/2018

तक्रारदार सौ.नंदा चौधरी वय-52 वर्षे रा.ठि. मगरपट्टा हडपसर पुणे यांचे पती सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक श्री.सोपान चौधरी यांचे ॲक्सीस बँक खात्यातून कोणीतरी अज्ञाताने ऑनलाईन पद्धतीने रू. 18,16,820/- परस्पर काढून घेवून आर्थिक फसवणूक केल्याबाबतची तक्रार सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा,पुणे शहर येथे प्राप्त झाली आहे, त्यावरून हडपसर पोलीस ठाणेस गु.नो.क्र. 733/2018 क. 420 भादंवि सह क. 65 माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये दि. 22/06/2018 रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

श्री.सोपान चौधरी यांचे एक्सीस बँक शाखा दादर सॅलरी बँक अकौंटमध्ये माहे सप्टेंबर 2017 मध्ये भविष्य निर्वाह निधीचे रू. 23 लाख जमा झालेले होते. तथापि ते त्यापुर्वीपासून प्रदीर्घ कालावधीकरीता आजारी असल्याने मुंबई व पुणे येथील हॉस्पीटल्समध्ये उपचार घेत होते. तब्बेत बरी झाल्यानंतर त्यांनी बँक खाते तपासले असता त्यांचे बँक खात्यातून इंटरनेट बँकींग द्वारे परस्पर व्यवहार करून दिनांक 29/09/2017 ते दि. 09/06/2018 दरम्यान एकूण 18,16,820/- रूपये ऑनलाईन पद्धतीने काढून घेतले असल्याबाबत त्यांना दि. 11/06/2018 रोजी समजले. त्यांनी तात्काळ सायबर क्राईम सेल येथे संपर्क केला. सायबर क्राईम सेलने त्यांचेकडील बँकेच्या माहितीचे व त्यास लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकाचे विश्लेषण केले असता असे समजले की, श्री.चौधरी यांनी उपचारादरम्यान हॉस्पीटलमध्ये देखभाल करण्यास नेमलेल्या ड्रायव्हर/नोकराने त्यांच्या बँक खात्याच्या डेबीट कार्ड क्रमांक व पीन क्रमांकाचा वापर करून इंटरनेट बँकींगच्या सहाय्याने वेळोवेळी रक्कम अन्य वेगवेगळया 10 खात्यांवर वळविली आहे.

सायबर क्राईम सेलकडील पथकाने तात्काळ मुंबई येथे जावून आरोपी नामे **दिनेश गोविंद साळवी वय-28वर्षे धंदा-ड्रायव्हर रा.ठि. 278, साईस्मृती सोसायटी, डी 4, गोराई 2, मंगलमुर्ती हॉस्पीटलजवळ, बोरीवली पश्चिम मुंबई** यास बोरीवली वेस्ट पोलीस ठाणेच्या हद्दीतून ताब्यात घेतले, तपासादरम्यान आरोपीने फसवणूक झालेली सर्व रक्कम फिर्यादीच्या डेबीट कार्ड व पिनचा वापर करून त्याच्या मित्रांच्या वेगवेगळया 10 बँक खात्यांमध्ये ऑनलाईन ट्रान्सफर केल्याची कबुली दिली आहे. आरोपीस हडपसर पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास हडपसर पोलीस ठाणे करत आहे.

सदरची कामगिरी पोलीस उप-आयुक्त श्री.सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त श्री.निलेश मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके, पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक सचिन गवते, पोलीस उपनिरीक्षक रुपाली पवार, पोशि नवनाथ जाधव, मपोशि शितल वानखेडे यांनी केली आहे.